Vol 6 Issue 2 March 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

# Indian Streams Research Journal

International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 2 | March - 2016


# महाभारतीय स्त्रीजीवन




सविता माधवराव पवार

कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलडाणा .


**प्रस्तावना :**

महाभारताला पंचमदेव म्हटले जाते. काळाच्या ओघात महाभारत कथा ही विस्तार पावत गेलेली आहे. व्यासकृत मूळ महाभारत 'हा जय नावाचा इतिहास आहे' या नावाने सिध्द झाले होते. हा इतिहास 8800 श्लोकांचा होता. नंतर हा इतिहास वैशंपायनाने राजा जनमेजयाला सांगितला. त्यावेळी ही श्लोकसंख्या 24000 श्लोकांपर्यंत गेली. त्याला 'भारत' असे नाव दिले गेले. पुढे हाच इतिहास सौतीने शौनकाला सांगितला तेव्हा ती श्लोकसंख्या जवळजवळ एक लक्ष श्लोकांपर्यंत पोहोचली. सौतीने कथन केलेले महाभारत हे 'महाभारत' या नावाने सिध्द झाले.

महाभारत कथेमध्ये सत्यवती, गंगा, अंबा, अंबिका, अंबालिका, कुंती, गांधारी, माद्री, द्रौपदी, सुभद्रा व इतर अर्जुनपत्नी, भीमपत्नी, उत्तरा ह्या चार ते पाच पिढ्यांतील स्त्रिया येतात. याशिवाय सावित्री, रेणुका, लोपामुद्रा, सुकन्या, दमयंती, देवयानी, शर्मिष्ठा, माधवी ह्याही स्त्रिया कथेच्या ओघामध्ये येतात. महाभारतीय स्त्री ही अतिशय सोशिक अशी स्त्री आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत तिच्या वाट्याला वेदना, असहायताच आली. तत्कालीन विवाहपद्धतीचा विचार करता, स्वयंवरासारख्या पद्धतीमध्येही स्त्रीला पतीनिवडीचे फारसे स्वातंत्र्य दिसत नाही. आर्यांमध्ये दासीसंग प्रतिष्ठेचा मानला जात असे. स्त्रियांची अप्रतिष्ठाच महाभारतामध्ये बऱ्याच अंशी पाहायला मिळते. युधिष्ठिर आणि भीष्माचार्यांच्या तोंडीही स्त्रियांना अवमानकारक शब्द येतात. पतीपरायण वृत्ती, पुत्रप्राप्तीला महत्व, पुत्र तर हवा, त्यातही अधिक पुत्र असायला हवेत अशी अपेक्षा, पती आणि पुत्र यातच तिचे सारे आयुष्य संपून गेलेले दिसते. राजकारणासाठी एक प्रकारे स्त्रियांचा वापर केला जात असे. कन्याशुल्क घेऊन मुलींचे विवाह होत असत, एकंदरीत पुरुषसत्ताक व्यवस्थेत महाभारतीय स्त्रियांची वाताहत झालेली दिसते,

त्याचाच शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

### स्त्रियांची पतीपरायण वृत्ती :

महाभारतीय स्त्रियांमध्ये पतीपरायणवृत्ती प्रकर्षाने दिसते. पुष्कळदा पतीकडून त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. परंतु त्या सर्व निमूटपणे सोसताना दिसतात. रेणुका ही जमदग्नीची पत्नी आणि परशुरामाची आई. पतीच्या दहशती खाली ती पिचून गेली होती. परपुरुषाची जलक्रीडा पाहताना त्याच्याविषयी स्पृहा निर्माण होऊन तिच्याकडून मानसिक व्यभिचार घडला म्हणून जमदग्नी तिचा धिक्कार करतो आणि परशुरामाला कुऱ्हाडीने तिचे मस्तक उडविण्याची आज्ञा देतो. एवढी प्रचंड शिक्षा रेणुकेला मिळालेली आहे. त्याची सेवा करताना त्याच्या शापाच्या भयाखाली ती वावरताना दिसते. महाभारताच्या आरण्यकपर्वात अध्याय 121 ते 123 मध्ये सुकन्येची कथा येते. सुकन्येचा वृध्द च्यवन ऋषीशी विवाह होतो. वृध्द असूनही त्याने शर्याती राजाची कन्या सुकन्या हिला मागणी घातली. च्यवनाने शर्यातीची कोंडी केली होती आणि त्यामुळे नाईलाजाने त्याने आपल्या मुलीचे च्यवनाशी लग्न लावले. सुकन्या पतीशी निष्ठावान राहिली आहे. अश्विनीकुमारांनी तिला एकदा पाहिले आणि वृध्द पतीला सोडून आपल्या दोघांपैकी एकाला स्वीकारण्याची विनंती केली. परंतु ती मात्र नकार देते.

विदर्भ देशाच्या भीम राजाची मुलगी दमयंती हिने आपल्या स्वयंवरात निर्णय स्वातंत्र्याचा वापर केला आहे. इंद्रादी देव तिच्या स्वयंवरामध्ये आले, परंतु त्यांच्या उपस्थितीत नलाला आपल्या बुध्दीने ती वरते. पुढे नलराजा द्युतातहरतो. त्याचा त्रास दमयंतीला होतो, परंतु ती त्याची साथ सोडत नाही. अत्यंत निष्ठेने ती त्याच्याबरोबर राहते. त्याला एकाकी सोडून माहेरी जाण्याचा विचारही तिच्या मनात येत नाही. मी प्रसंगी स्वतःचा त्याग करेनपण तुझा त्याग करणार नाही, अशी निष्ठा तिच्याजवळ आहे. नलराजा मात्र निर्जन वनामध्ये तिला एकाकी सोडून देतो. चेदीराज सुबाहुच्या नगरीत पोचल्यानंतर राजमातेला ती ज्या अटी घालते, त्यावरूनही तिच्या स्वभावातील तेजस्वीपणा लक्षात येतो. मी उष्टे खाणार नाही, कुणाचे पाय धुणार नाही, कोणा पुरुषाने माझी कामना केली, तर त्याला तुम्ही शासन केले पाहिजे, अशा तिच्या अटी असतात.

नलाला शोधण्यासाठी आपल्या दूतांमार्फत दमयंती प्रयत्न करते. त्याचा शोध लागावा म्हणून स्वतःचे स्वयंवर मांडते. ऋतूपर्ण राजाकडे बाहुक नावाने सारथी म्हणून काम करणारा नल जेव्हा दमयंतीला भेटतो, तेव्हा तो तिलाच दुषणे देताना दिसतो. बाहुकाने विदर्भाला यावे आणि तो नल आहे की नाही याची खात्री व्हावी या साठी स्वयंवराच्या घोषणेचे नाटक दमयंती करते. दमयंती ही नलाच्या तुलनेत प्रयत्नवादी, बुध्दिवान आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी आहे. स्वतःला एकाकी अवस्थेमध्ये वनात सोडून गेलेल्या आपल्या पतीबद्दल नितांत प्रेम तिच्या मनात आहे.

महाभारताच्या मुख्य कथेचा विचार करता, सत्यवती, अंबिका, अंबालिका, कुंती, माद्री,गांधारी, द्रौपदी यांच्या जीवनाचा विचार केला तर पती हा त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. पतीविषयी समर्पित भावना त्यांच्या ठिकाणी दिसून येते. ज्याला सोळा वर्षाचा मुलगा आहे अशा शंतूनशी सत्यवतीचा विवाह होतो. अंबिका, अंबालिकेला विचित्रवीर्याच्या विधवा म्हणून जीवन काढावे लागते. कुंतीला सवत पाहावी लागली. माद्रीला सती जावे लागले. गांधारीला अंध धृतराष्ट्राशी विवाह करावा लागला. द्रौपदीला पाच पतींची पत्नी व्हावे लागले. महाभारतकालीन स्त्रीजीवनाचा विचार करता असे म्हणता येते की, पतीशिवाय स्त्रीच्या आयुष्याला गती नव्हती. पती हेच अंतिम सुख. त्याची सेवा करणे, त्याच्या आज्ञेत राहणे, त्याच्या सुखात स्वतःचे सुख पाहणे यापलीकडे स्त्रीच्या आयुष्याला अर्थ नव्हता. पती आणि पुत्र यामध्येच तिचे आयुष्य गुंतून गेलेले दिसते. स्वतःच्या भावभावनांची कुचंबणा त्यांना सोसावी लागली आहे.

### पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे झालेली वाताहत :

महाभारतकाळात स्त्रियांच्या संदर्भात कुठेही औदार्याची वा सन्मानाची भावना दिसत नाही. आर्यधर्माच्या चौकटीमध्ये स्त्रियांचे स्वातंत्र्य, त्यांचे व्यक्तिमत्व याला काहीच अर्थच उरलेला नव्हता. स्त्रियांना विवाहासाठी पळवून आणले जाई. भीष्माने काशीराजाच्या कन्यांना विवाह मंडपातून आपल्या सावत्र भावासाठी पळवून आणले होते. काशीराज्याच्या तीन कन्यांपैकी अंबेला तर आपले आयुष्यच संपवून टाकावे लागले. आदिपर्व व उद्योगपर्वात अंबेची कथा येते. तिने आधीच मनोमन शाल्वाला वरले होते. आणि भीष्माने तिला स्वयंवर मंडपातून पळवले. नंतर भीष्माने जरी तिची शाल्वाकडे रवानगी केली असली तरी शाल्व तिचा स्वीकार करत नाही. " भीष्माने तुला जिंकून नेले, तेव्हा तू प्रीतीमती होतीस. ज्ञान प्राप्त केलेल्या आणि इतरांना धर्माचा उपदेश करणारा आमच्यासारखा राजा 'परपूर्वा' स्त्रीशी कसा बरे संबंध करील ?"[1] शाल्वाचे हे उद्गार तत्कालीन समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करणारे आहे. शाल्व तिचा स्वीकार करत नाही आणि भीष्मही स्वतःसाठी वा भावासाठी तिचा स्वीकार करीत नाही. अशा परिस्थितीत अंबेला आत्महत्या करावी लागली आहे. पती हीच स्त्रीची गती असे मानणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये अंबेचा बळी गेलेला दिसतो.

पुरुषप्रधान व्यवस्थेचा फटका शकुंतलेलाही बसलेला दिसतो. आदिपर्वाच्या अध्याय 62 ते 69 मध्ये शकुंतलेची कथा येते. शकुंतलेला मेनकेने टाकले आणि नवऱ्यानेही टाकले. कण्व कन्यादान करतील, मुहूर्तभर वाट पहा, तोपर्यंत येतील असे शकुंतला म्हणते. परंतु दुष्यंत शरीरसंबंधाला उतावीळ झालेला दिसतो. पुढे तो घ्यायला येईल म्हणून शकुंतला वाट पाहते. स्वतः दरबारात गेलेल्या शकुंतलेला तो ओळखही दाखवत नाही. उलट वेश्या, दुष्ट तापसी काय वाटेल ते बोलतो. तिला मात्र संयमाने घ्यावे लागते. स्वतःचे नाही तर नाही पण मुलाचे हित तरी व्हावे, हा विचारही तिच्या समोर असतो. स्त्रियांच्या जीवनाची इतिकर्तव्यता पती आणि पुत्राचे हित पाहण्यातच मानली जायची. परिस्थितीविरुध्द बंड करण्याचा प्रयत्न स्त्रियांनी केलेला दिसत नाही. प्राप्त परिस्थितीचा स्वीकार मात्र या स्त्रियांनी केलेला आहे. क्वचितच काही स्त्रियांचा वेगळेपणा दिसतो. भीष्माविषयीच्या सूडभावनेने अंबा बंड करण्याचा प्रयत्न करते. तिचा तेजस्वीपणा उठून दिसतो पण शेवटी तिला आत्महत्या करावी लागते. लोपामुद्रेची कथा आरण्यकपर्वाच्या अध्याय 94 ते 97 मध्ये येते. आपल्या वडिलांना संकटातून वाचवण्यासाठी लोपामुद्रा अगस्त्य ऋषीशी विवाह करते. परिस्थितीच्या दडपणामुळे तिने अगस्त्याला स्वीकारले परंतु तिचा ऋतुकाळ संपत आला तरी त्यांचा शरीरसंबंध आला नव्हता. या रीतीने एकप्रकारे तिने बंडच केले. अंबा, लोपामुद्रा यांनी त्यांच्यापरीने प्रतिकार केला असला तरी त्यांना पुरुषप्रधान व्यवस्थेचे चटके सोसावे लागलेआहेत.

सावित्रीचे उपाख्यान महाभारताच्या आरण्यकपर्वात अध्याय क्र. 277 ते 283 मध्ये आले आहे. राजा अश्वपतीला पुत्राची अपेक्षा होती परंतु त्याला कन्याप्रप्ती झाली. तिचे नाव सावित्री ठेवले. वयात आलेल्या सावित्रीला कोणी वरत नव्हते. राजाला चिंता वाटायला लागली. तो सावित्रीला म्हणतो, "मुली तुझे विवाहाचे वय झाले आहे. परंतु तुला कोणी वरत नाही. तेव्हा स्वतःला साजेशा, गुणांनी युक्त अशा पतीची निवड तू स्वतःच कर."[2] वयात आलेल्या मुलीचा विवाह होत नसेल तर समाजात ही गोष्ट निंदास्पद मानली जायची. मुलीच्या हितापेक्षा आपली प्रतिष्ठा राजाने महत्वाची मानलेली दिसते. भाऊ नसलेल्या मुलीशी विवाह करायला लोक कचरत असावेत. कारण अशा मुलीचा पुत्र हा तिच्या वडिलांचा वारस मानला जाई, हे सुध्दा कारण सावित्रीचा विवाह न जुळण्यामागे असावे. ती शाल्वदेशाच्या परंतु वनवासी असलेल्या आणि अनारोग्याने पीडित सत्यवानाची निवड करते. तो फार काळ जगणार नाही, हे माहित असतानाही तिचा सत्यवानाशी विवाह होतो. ही बाब विचार करायला लावणारी आहे. मुलीचे अविवाहित राहणे त्या काळात अत्यंत निंद्य मानले जात असावे, तसेच तिचे पारलौकिक कल्याण होत नाही, असाही समाज होता. त्यामुळेच समोर वैधव्य दिसत असूनही ती सत्यवानाशी विवाह करते. सावित्रीच्या व्यक्तित्वाचा विचार करता, ती पुरुषसत्ताक व्यवस्थेची बळी तर ठरली आहेच,त्याचबरोबरतिने पुरुषप्रधान व्यवस्थेची पाळेमुळे आधिक मजबूत बनविली आहेत असेच दिसते.

महाभारताच्या काळामध्ये एकही स्त्री राजगादीवर बसलेली दिसत नाही, किंवा राज्यकारभारामध्ये, निर्णयप्रक्रियेमध्ये सहभागी होतानाही दिसत नाही. कुंती, द्रौपदी ह्या पांडवाना राज्यप्राप्तीसाठी सतत चेतना देत होत्या, तेवढे काय म्हणता येईल. सत्यवतीचा विचार करता आपल्या पुत्राला राजगादी मिळावी म्हणून तिच्याकडून भीष्मावर अन्याय झाला. शंतनूच्या मृत्यूनंतर सत्यवतीने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली नाहीत. मुलांची काळजी करताना ती दिसते. विचित्रवीर्यासाठी वधू आणण्यासाठी भीष्मावर भार टाकताना दिसते. विचित्रवीर्याच्या मृत्यूनंतर कुरुवंश नष्ट होण्याच्या मार्गावर असताना तिला काळजी वाटते. तसाही भीष्माची प्रतिज्ञा आणि विचित्रवीर्याचा मृत्यू येथे कुरुवंश नष्ट झालेलाच आहे. हा वंश वाढावा यासाठी विचित्रवीर्याच्या विधवा अंबिका व अंबालिका यांच्याकडे ती व्यासाला पाठवते. तुमच्याकडे तुमचा दीर येणार आहे, एवढीच मोघम माहिती ती अंबिका व अंबालिकेला देते. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये घराच्या चौकटीच्या आत मोठ्यांच्या आज्ञेने झालेला हा एकप्रकारचा बलात्कारच. घराण्याला पुत्र हवा, वंश पुढे चालावा यासाठी स्त्रियांवर अन्याय होत. त्यांच्या मनाचा विचार केला जात नसे.

अंध धृतराष्ट्राशी सुकुमार गांधारीचा विवाह होतो. सत्य परिस्थिती कळते तेव्हा तीही डोळ्यांना पट्टी बांधून घेते. एकप्रकारचा तिचा हा निषेधच म्हणता येईल. डोळे बांधून धृतराष्ट्राला अखेरपर्यंत तिने सोबत केली आहे. समाजव्यवस्थेमध्ये, कुटुंबव्यवस्थेत ह्या स्त्रिया परिस्थितीपुढे हतबल झालेल्या दिसतात. त्यांचे वैफल्य नाना तऱ्हेचे आहे. अनेक प्रकारचे सोसणे त्यांच्या वाट्याला आले आहे. कुंतीला विवाहापूर्वी झालेले मुल सोडून द्यावे लागले. त्यानंतर पांडूराजाशी तिचा विवाह झाला. कुंतीला अपत्यप्राप्ती होत नाही म्हणून माद्री तिच्या जीवनात सवत म्हणून आली. आपण अपत्यप्राप्तीसाठी सक्षम आहोत, याचा अनुभव घेतलेला असूनही तिला गप्प राहावे लागले. दोष आपल्यामध्ये नसून राजामध्ये आहे, ही बाब पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत तिला दडवून ठेवावी लागली. कुंती व माद्री दोघींनाही पुत्रप्राप्ती होत नाही तेव्हा पांडू राजाआपल्या दोन्ही राण्यांसह विजनवासात ब्रम्हावर्तात जातो. कारण धृतराष्ट्राला आधी पुत्र झाला तर तो कदाचित हस्तिनापूरचा राजा होईल ही भीती असते. त्यामुळे कदाचित कुंतीनेच विजनवासाचा मार्ग निवडला असावा. याकाळात कुंतीला तीन तर माद्रीला दोन पुत्र झाले. माद्रीला आणखी पुत्र हवा होता पण कुंती ही गोष्ट धुडकावून लावते. "मी वेडी, मला कळले नाही की जुळे होईल म्हणून, आणखी एकदा मंत्र दिला, तर ती काय करील कोण जाणे ! तिचाच वरचष्मा व्हायचा सर्व प्रकारे. आता कुणालाच मुले नकोत, तिलाही नको व मलाही नको."3अशा प्रकारची घालमेल तिच्या मनाची झाली असावी. पतीच्या मृत्युनंतर माद्रीला आपले आयुष्य निरर्थक वाटते. मनाच्या विकल अवस्थेत ती सती जाते. माद्रीचे एक उदाहरण सोडल्यास कुरुवंशातील स्त्रिया सती जाताना दिसत नाहीत.

माद्रीची मृत्यूने सुटका केली परंतु कुंती मात्र पुरती अडकली. तिला आयुष्यभर संघर्ष करावा लागला. डोळ्यांत तेल घालून मुलांची निगराणी करावी लागली. पाच पांडवामध्ये तिने कधी फुट पडू दिली नाही. पांडव राज्याभिषेक झालेल्या राजाचे पुत्र होते तेव्हा त्यांना राज्य मिळावे यासाठी ती धडपडत होती. महाभारतकाळी स्त्रियांचे समाजातील स्थान नवरा व मुलगा यावर अवलंबून होते. नवऱ्याची पहिली बायको व्हायचे नाही तर आवडती बायको व्हायचे. मुलाला राज्य मिळवून द्यायचे. कुंती "स्वतःच्या स्थानाबद्दल, हक्काबद्दल अत्यंत जागरूक, क्षत्रियत्वाचा अति अभिमान असलेली अशी ती बाई होती. जीवन ही तिच्या मते लढाई होती."[4] आयुष्यभर कुंती जीवनरूपी लढाई लढताना दिसते. पांडूच्या मृत्यूनंतर आश्रितासारखी कधी राजमहालात तर कधी विदूराच्या घरी ती राहिली. इंद्रप्रस्थाला युधिष्ठिराला राज्याभिषेक झाला तेवढाच काय तो काळ ती राजमाता म्हणून वावरली. कुंतीच्या वाट्याला वेदना, दुःख, संघर्ष आला. अखेरपर्यंत तिने संघर्ष केला. राज्य मिळाल्यावरही वैभवाच्या मोहात ती गुंतून पडली नाही. राजघराण्यातील असूनही कुंतीचे आयुष्य कष्टमय राहिले.

पांडवांच्या जीवनात द्रौपदीचे स्थान अनन्यसाधारण होते. द्रौपदी पांडवांची पत्नी होती. 'भिक्षा' म्हणून तिचा उल्लेख कुंतीसमोर केला जातो आणि ती 'पाचांमध्ये वाटून घ्या' असे म्हणते. हे जर खरे मानले तर त्याकाळच्या स्त्रीच्या दर्जावर प्रकाश पडतो. स्त्री ही भिक्षा म्हणजे उपभोग्य वस्तू ठरते. कुंती आणि युधिष्ठिराने द्रौपदीचा पाचही जणांशी विवाह व्हावा असे ठरविलेले दिसते. यावर द्रौपदीची प्रतिक्रिया मात्र मिळत नाही. तिने निमुटपणे पाचांची पत्नी होण्याचा निर्णय मान्य केलेला दिसतो. युधिष्ठिर द्रुपदाला म्हणतो, "तुझी कन्या रत्नस्वरूप आहे. रत्नाचा सहभोग घ्यावयाचा, असा आमचा संकेत आहे. आम्ही त्या संकेताचा त्याग करू इच्छित नाही. धर्मानुसार कृष्णा आमच्या सर्वांची राणी होईल. तिने अग्निसमक्ष ज्येष्ठतेनुसार क्रमशः सर्वांचा हात स्वीकारावा."[5]

द्रौपदीचे बहुपतित्व हा त्या काळातील अपवादात्मक प्रकार दिसतो. तरीसुध्दा समाजाकडून ही गोष्ट स्वीकारली गेलेली दिसते. कर्णदुर्योधनादींनी केलेल्या टिकेव्यतिरिक्त या घटनेचा विरोध म्हणून समाजाकडून झालेला दिसत नाही. पाच पांडवांची पत्नी होण्यात द्रौपदीच्या मनाचा विचार पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत झाला नाही. ती एक 'जीत' वस्तूच होती. तिलाही हा निर्णय मुकाटपणे स्वीकारून आयुष्यभर पाळावा लागला. यातून पाच पांडवांना एकत्रित बांधून ठेवण्याचे कामही तिने केले आहे.

द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगाचा विचार करता, पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये राजदरबारात वयोवृद्धांच्या उपस्थितीत घराण्याच्या कुलवधुचा असा अपमान, विटंबना होते, यावरून स्त्रियांविषयीच्या सन्मानाची कल्पना येते.या प्रसंगी 'अर्थस्यः पुरुषः दासः' असे म्हणून भीष्माचार्य स्वतःची सुटका करून घेतात. श्रीकृष्णाने द्रौपदीला वस्त्र पुरविले हा प्रसंगही अवास्तव वा गैरलागू वाटतो. कारण राजसूय

यज्ञप्रसंगी शिशुपाल वधानंतर शाल्वाने व्दारकेवर आक्रमण केल्याची वार्ता श्रीकृष्णाला कळाल्यानंतर तो घाईघाईने व्दारकेला रवाना होतो. त्यानंतर काही दिवसातच द्युत क्रीडा आणि द्रौपदीची विटंबना या गोष्टी घडल्या. वनपर्वात काम्यकवनात वनवासी झालेल्या पांडवांना भेटायला कृष्ण जातो आणि द्युतक्रीडेच्या प्रसंगी मी शाल्वाशी लढण्यात गुंतलो असल्यामुळे पुढे काय झाले, ते मला कळले नाही, त्यासाठी तुम्हाला भेटायला मी इथे आलोआहे, असे कृष्ण पांडवांना म्हणतो. यावरून श्रीकृष्णाकडून वस्त्र पुरविण्याचा असा प्रकार घडला नसल्याची कल्पना येते. द्रौपदीला भरदरबारात ओढून आणून तिची झालेली विटंबना, अपमान हा एकप्रकारे वस्त्रहरणाचा प्रकार आहे किंवाप्रत्यक्षात वस्त्रहरणही झाले असावे किंवा तिच्या वस्त्रांपर्यंत हात गेले असेही म्हणता येईल. सासरच्या वडीलधाऱ्यांच्या उपस्थितीत द्रौपदीचा हा अपमान सत्तेचे दास असलेले सर्व खाली माना घालून पाहत होते. कुरुवंशामध्ये अशा स्वरुपाची विटंबना कोणत्याही स्त्रीची झालेली दिसत नाही.

महाभारत युध्दप्रसंगी कुंती आणि श्रीकृष्ण कर्णाला द्रौपदीचे आमिष दाखवतात. हे जर खरोखर घडले असेल तर स्त्रीला उपभोग्य वस्तूपलीकडे काही दर्जाच नव्हता, असेच म्हणावे लागेल. परंतु त्यावेळी द्रौपदीच्या आणि कर्णाच्या वयाचा विचार करता असा प्रकार घडला नसावा असेही वाटते. पांडवांना अभेद्य ठेवण्याचे काम तिने केले. त्यांची सेवा केली. त्यांच्यासोबत वनवास स्वीकारला. पाच पतींविषयी समान भाव ठेवताना तिची कसरतच होत असावी. तरीही त्यांच्या मनात तिच्याविषयी किती आत्मियता होती, हा प्रश्नच आहे कारण स्वर्गारोहणाच्या वेळी द्रौपदी पडते तेव्हा युधिष्ठिराने आपल्या मनातील शल्य बोलून दाखविले आहे. तिचे सर्वात जास्त प्रेम अर्जुनावरच होते, अशी खंत मरणाच्या दारात असलेल्या द्रौपदीला तो ऐकवतो. द्रौपदीलाही सवत पाहावी लागली आहे. युधिष्ठिराखेरीज इतरांना द्रौपदीशिवाय अन्य बायका होत्या. आर्यांच्या समाजव्यवस्थेत स्त्रियांची स्थिती असहाय, पराधीन आणि परिस्थितीशरण दिसते. अनेक तऱ्हेचे भोग, वेदना सोसण्यातच त्यांचे आयुष्य संपून गेलेले आहे. स्त्रियांना सन्मानाची वागणूक दिसत नाही. स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार दिसत नाही.

### *वंशसातत्याला महत्व :*

आपला वंश पुढे चालावा, तो खंडित होऊ नये, यासाठी पुत्रप्राप्तीची अपेक्षा केली जात असे. बहुपुत्रत्वाची आवश्यकताही वाटत असे. त्यातूनच बहुभार्याची चालही निर्माण झाली असावी. गांधार देशातील स्त्रिया ह्या बहुप्रसवा आहेत असा समज होता म्हणून भीष्माने धृतराष्ट्रासाठी कन्याशुल्क देऊन गांधारीला आणले. कुंतीला पुत्र होत नाही म्हणून मद्र देशातून कन्याशुल्क देऊन माद्रीला आणले. आपला पुत्र राजगादीवर बसावा अशी अपेक्षा सत्यवतीनेही ठेवली होती. तसे वचन तिने घेतले होते. पतीला राजगादी मिळावी, पुत्राला राजगादी मिळावी यासाठीच या स्त्रियांची सारी धडपड दिसते. विचित्रवीर्याच्या मृत्यूनंतर अंबिका, अंबालिका विधवा झाल्या. खऱ्या अर्थाने कुरुवंश येथेच खंडित झाला. वंश पुढे चालावा आणि राजगादीला वारस मिळावा, यासाठी नियोगाव्दारे त्यांच्या ठिकाणी पुत्रप्राप्ती करवून घेतली गेली. निपुत्रिक स्त्री किंवा निपुत्रिक विधवा कुलमुख्याच्या आज्ञेवरून अन्य पुरुषापासून संतती उत्पन्न करते, त्या विधीस नियोग असे संबोधले आहे. नियोगात प्रजोत्पादनात पहिला अधिकार दिराचा नंतर ब्राम्हणाचा असे. या प्रकारात स्त्रीच्या मनाचा विचार होत नसे.

महाभारताच्या उद्योगपर्वात अध्याय 104 ते 121मध्ये ययातीकन्या माधवीची कथा येते. तिच्या कथेत नियोगाचे कार्य पुरुषाने स्त्रीकडून केलेले आहे. गालवाला 800श्यामकर्ण घोडे विश्वामित्राला द्यायचे असतात. तो ययातीकडे घोड्यांची मागणी करतो. तेव्हा ययाती आपली कन्या माधवीलाच गालवाला देतो आणि तिचे शुल्क म्हणून इतर राजांकडून तू घोड्यांची प्राप्ती कर असे सांगतो. आपल्या मुलीकडे एक वस्तू म्हणून ययातीने पाहिलेले आहे. तिच्या इच्छेचा वा मनाचा विचार केलेला नाही. आपल्या मुलीच्या सन्मानाला आपण धक्का पोहचवतो आहे अशी भावना दिसत नाही. माधवीकडून पुत्राची प्राप्ती बदल्यात दोनशे घोडे असे कराराचे स्वरूप ठरवून 800घोड्यांची प्राप्ती माधवीचे शुल्क म्हणून गालव प्राप्त करतो. हर्यश्व राजा, दिवोदास राजा, औशीनर राजा आणि विश्वमित्र एका पुत्राच्या प्राप्तीसाठी माधवीला स्वीकारतात. पुत्रप्राप्तीबरोबर करार आपोआप संपल्यामुळे तिला दुसऱ्या पुरुषाशी संबंध करण्याची मोकळीक मिळत असावी. अशा संबंधात कराराचे स्वरूप दिसते तसेच माधवीने एकापेक्षा अधिक पुरुषांसाठी नियोगाव्दरे क्षेत्र म्हणून काम केले असेही म्हणता येईल. नियोग हा पुत्रप्राप्तीसाठीच घडवून आणला जात असे. कन्या जन्माला महत्व नव्हते, हे यावरून लक्षात येते. अर्थात माधवीची ही कथा कौरव पांडवांच्या काही पिढ्यांआधीची आहे.

नियोगाव्दारे अंबिका व अंबालिकेला पुत्रप्राप्ती झाली, ही गोष्ट अर्थातच उघड होती. धृतराष्ट्र, पांडू, विदुर यांचे पिता कोण हे समाजाला माहित होते. परंतु पुढच्या पिढीत कुंती आणि माद्रीला नियोगाची गरज भासली तेव्हा मुलांचा पिता कोण, ही बाब लपवून ठेवलेली आहे. मुले देवपुत्र आहेत अशी वार्ता केली गेली. हळूहळू पुढील पिढीत नियोग विधी समाजमान्य राहिला नसावा का ? किंवा पांडूचे पुत्र कुरुवंशीय नाहीत म्हणून राजगादीला ते अपात्र ठरतील अशी भीती असावी म्हणूनही नियोगाचा प्रकार लपवून ठेवला गेला असावा. अंबिका, अंबालिकेच्या बाबतीत त्या विधवा होत्या आणि राज्याला इतर कोणी स्पर्धक नव्हता. परंतु कुंती आणि माद्रीच्या बाबतीत त्यांचा पती जिवंत होता आणि राजगादीला धृतराष्ट्राला होणारी मुले स्पर्धक म्हणून उभी राहणार होती. ह्या अडचणी कुंती समोर होत्या. सत्यवती, अंबिका, अंबालिका, कुंती, माद्री, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, उत्तराया सर्वांना पुत्रप्राप्तीच झालेली दिसते. गांधारीलाच एकमेव दुःशाला ही कन्या होतीआणि त्याशिवाय शंभर पुत्र होते. इतर स्त्रियांना मात्र एक वा एकापेक्षा अधिक पुत्रचझालेले आहेत. राजाला पुत्र नसेल आणि कन्याच असेल तर कन्येचा पुत्र हा तिच्या वडिलांचा पुत्र मानला जाई. अर्जुनाने चित्रांगदा या मणलूरच्या राजाच्या एकुलत्या एक मुलीशी विवाह केला. अर्जुनाला बभ्रूवाहन या आपल्या पुत्राला तेथेच सोडावे लागले आहे. महाभारत काळी राजाला मुलगा नसेल तर मुलगी राजगादीवर बसलेली दिसत नाही. राजा वारल्यानंतर त्याची विधवा पत्नी राज्यकारभार करते असेही उदाहरण दिसत नाही. वंशसातत्य टिकविणे आणि पुत्र जन्माला घालणे एवढेच स्त्रीजीवनाचे उद्दिष्ट दिसते.

### *विवाहाचे स्वरूप :*

महाभारतकाळी पतीनिवडीचे मर्यादित स्वातंत्र्य स्त्रियांना होते. दमयंतीचे स्वयंवर रचले गेले. तिने पतीनिवडीचे स्वातंत्र्य घेतलेले दिसते. द्रौपदीच्या स्वयंवरात पण लावला होता. अर्जुनाने पण जिंकला पण तिला पाच पतींची पत्नी व्हावे लागले. कारण त्यांच्या दृष्टीने ती

एक जीत वस्तू होती आणि जिंकलेल्या वस्तूच्या इच्छेचा विचार केला जात नाही. त्याकाळी बहुपतिकत्वाची चाल दिसत नाही. द्रौपदीचे एक अपवादात्मक उदाहरण दिसते. सत्यवती, अंबिका, अंबालिका, कुंती, माद्री यांचा एकापेक्षा अधिक पुरुषाशी संबंध आलेला आहे. महाभारतकाळी पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत असे प्रकार घडलेले आहेत. काही परिस्थितीत कौमार्याच्या वरदानाचा वापर करून घेतलेला दिसतो. त्यामुळेच सत्यवती, कुंती, माधवी यांना कौमार्यभंगानंतरही कुमारी मानण्यात आले आहे. कुंतीला तर आपल्या आयुष्यातील घटना दडवून ठेवणे आवश्यक वाटले. गांधारी आणि माद्रीला कन्याशूल्क देऊन आणण्यात आले. शर्मिष्ठा, सुकन्या, लोपामुद्रा, गांधारी यांचे वडील आपले राज्य टिकविण्यासाठी मुलीच्या सौख्याचा बळी देताना दिसतात. सुकन्या, लोपामुद्रा यांना वृध्दाशी विवाह करावा लागला. गांधारीला जन्मांधाशी विवाह करावा लागला तर शर्मिष्ठेला दासी म्हणून वावरावे लागले. ययातीकडे विवाहाची याचना करावी लागली. ती म्हणते, " हे राजा, स्वतःचा पती आणि मैत्रिणीचा पती हे समान मानले जातात. हे राजा भार्या, दास आणि पुत्र हे तिघेही अधन असतात. ते जे काही प्राप्त करतात, ते त्यांच्या स्वामीचे धन असते. मी देवयानीची दासी आहे. देवयानी ही तुझी पत्नी आहे,त्यामुळे तू तिचे आणि माझे भरण करायचे आहे. तेव्हा माझा स्वीकार कर."[6] शर्मिष्ठेच्या या याचनेवरून राजकन्या असूनही तिच्या वाट्याला आलेली अप्रतिष्ठा दिसून येते. आत्मसन्मान गमावून शर्मिष्ठेला जगावे लागले आहे.

सुभद्रेला पळवून नेऊन अर्जुनाने विवाह केला. स्वयंवर रचले तर तिच्या मनात नेमके काय आहे आणि काय घडेल याची निश्चित खात्री नसल्यामुळे श्रीकृष्णाच्या मदतीने अर्जुनाने सुभद्रेला पळवले. त्याकाळी स्त्रियांना पळवून नेऊन विवाह करणे क्षत्रियांच्या दृष्टीने प्रशंसनीय बाब मानली होती. रुक्मिणीचेही श्रीकृष्णाने हरण केले होते. अंबिका, अंबालिकेला भीष्माने भावासाठी पळवून आणले होते. स्त्रियांच्या जीवनाला विवाहाशिवाय गती नव्हती. त्यामुळेच अंबेला अग्निकाष्ठ भक्षण करून स्वतःला संपवून टाकावे लागले. सावित्रीला दरिद्री, आरोग्य नसलेल्या सत्यवानाशी विवाह करावा लागला. द्रौपदी, अंबा यांच्यामध्ये तेजस्वीपणा दिसतो. कुंतीच्या ठिकाणी धोरणीपणा, संयम दिसतो. त्यांच्या ठिकाणी असलेल्या गुणांमुळे त्यांना वेगळे स्थान प्राप्त करता आलेलेनाही, वेगळे कर्तृत्व दाखवता आले नाही. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा एक भागम्हणूनच त्यांना राहावे लागले. त्याकाळी खालच्या जातीतील स्त्रियांना वरच्या जातीतील पुरुषाशी विवाह करता येत असे. सत्यवती धीवरकन्या होती परंतु तिचा शंतनुशी विवाह झाला. बहुपत्नीत्वाची प्रथा होती. द्रौपदीला सवती होत्या. कुंतीलाही सवत होती. विचित्रवीर्याला दोन बायका होत्या. श्रीकृष्णालाही अनेक बायका होत्या. त्यामुळेही स्त्रियांना नवऱ्याच्या मर्जीत रहावे लागे. शिवाय दासीसंग हा एक पुरुषार्थ मानला जाई. दासींपासूनही पुत्रप्राप्ती होत असे. धृतराष्ट्राला गांधारीपासून 14 योनीजपुत्र तर 86 दासीपुत्र आणि मानलेले पुत्र होते. दासी दान मिळाल्याचे उल्लेखही सापडतात.

या काळात करारात्मक स्वरूपाचे संबंधही स्त्रीपुरुषांमध्ये दिसतात. देवकन्या, अप्सरा ह्या ऋषींशी वा राजांशी करारात्मक पातळीवर संबंध ठेवत असत. करार संपला की, त्यांच्या आयुष्यातून निघून जात. उदा. गंगा ही शंतनूला सोडून निघून जाते. मेनका ही विश्वामित्राला सोडून गेली. भारव्दाज ऋषी व घृताची अप्सरा यांचा करार संपल्यानंतरघृताची निघून जाते. पुढे द्रोणाचे पालनपोषण भारव्दाज ऋषी करतात. गौतम ऋषी आणि जालवती अप्सरेच्या सहजीवनातून कृप व कृपी जन्मली नंतर जालवती सोडून गेली.[7] बहुपत्नीत्व, स्त्रियांना पळवून आणणे, कन्याशुल्क देऊन आणणे, दासीसंगाला असलेली मान्यता, कौमार्याला असलेले महत्व यामुळे स्त्रियांचे वैवाहिक जीवन सुखावह होते असे म्हणता येत नाही. विवाहामुळे त्यांचे जीवन बंदिस्त आणि पुरुषांचे अंकित होऊन राहिले होते.

***समारोप :***

महाभारतीय स्त्रीजीवनाचा विचार करता या काळात स्त्रियांच्या संदर्भात औदार्याची, सन्मानाची भावना दिसत नाही. स्त्रियांच्या वाट्याला वेदना, दुःख, अवहेलना आलेली दिसते. या काळातील स्त्रिया परिस्थितीशरण राहिल्या आहेत, याला कारण म्हणजे पुरुषप्रधान समाजव्यवस्था. या व्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष वडील आपल्या मुलीच्या सौख्याचा बळी देताना दिसतो. माधवी, शर्मिष्ठा, सुकन्या, लोपामुद्रा, गांधारी यांच्या जीवनाचा विचार करता असे चित्र दृष्टीस पडते. काशीकन्यांना पळवून आणणे, त्यांना अनिच्छेने नियोगाला सामोरे जायला लावणे, गांधारीची फसवणूक, माद्रीला सती जावे लागणे, अंबेला आत्मघात करावा लागणे, द्रौपदीला पाचांत विभागणे, भर दरबारात तिची झालेली विटंबना यासाख्या घटनांतून तत्कालीन स्त्रियांच्या दर्जाविषयी कल्पना येते. पुरुषांच्या करणीने त्यांना मानसिक क्लेष सोसावे लागले. स्वतःच्या सुखासाठी, स्वार्थासाठी पुरुषांनी त्यांचा वापर केलेला दिसतो. स्त्रियांजवळ सोसण्याशिवाय पर्याय नव्हता. तक्रार करायला त्यांना जागा नव्हती. पतीच्या जीवनाशी, त्याच्या सुखदुःखाशी, मानापमानाशी या स्त्रिया एकरूप झालेल्या दिसतात. द्रौपदीला तर पाच जणांशी संसार करावा लागला. पतीनिवडीचे स्वातंत्र्य स्त्रियांच्या संदर्भात नव्हते असेच म्हणावे लागते. पती हीच स्त्रियांची गती होती. पती आणि पुत्राचे हित यांतच त्यांचे आयुष्य झुलत राहिले आहे. दुष्यंतासारखा राजा शकुंतलेची फसवणूक करतो. सावित्रीचे लग्न जुळवताना राजा अश्वपती हतबल होतो. ययाती आपली कन्या माधवीला एकप्रकारे विकण्यासाठी देऊन टाकतो. अंबेचा स्वीकार न करणारा शाल्वराजा, द्रौपदीची विटंबना डोळ्यांदेखत पाहणारे पांडव, तिला अपमानित करणारे दुर्योधन दुःशासनादी तिचे दिर यांसारखे पुरुष महाभारतात भेटतात. त्यांच्या दुर्दशेला परिस्थिती पेक्षा त्यांच्या जवळचे पुरूषच कारणीभूत दिसतात. एक उपभोग्य आणि पुत्र प्राप्त करून देणारी वस्तू असे स्वरूप त्यांच्या जीवनाला प्राप्त झालेले दिसते. कन्या जन्माला महत्व नव्हते. पुत्र जन्म मात्र महत्वाचा असे. एकापेक्षा अधिक पुत्रांची अपेक्षा केली जायची. वंशसातत्याच्या आणि सामर्थ्याच्या दृष्टीने पुत्रजन्माचे स्वागत व्हायचे. घराण्याला वंश नसेल तर नियोगाच्या व्दारेही पुत्रप्राप्ती करुन घेतली जायची. विधवा स्त्रियांनाही नियोगाची आज्ञा दिली जात असे. राजगादीवर बसण्याचा स्त्रियांना अधिकार नव्हता. तसे उदाहरण दिसत नाही. एकंदरीत महाभारतीय स्त्रियांच्या वाट्याला वेदना, असहायताच आलेली आहे. स्त्रियांच्या सुखाचा विचार न करता, त्यांच्याव्दारे सुख आणि स्वार्थ साधण्याचा प्रयत्न दिसतो. प्राप्त परिस्थिती स्वीकारून स्वतःच्या सुखाचा विचार न करता पती आणि पुत्र यांचे हित पाहणे हीच त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता राहिली आहे आणि तशी समाजाचीही धारणा होती आणि त्यांची स्वतःची इच्छाही त्यापलीकडे दिसत नाही. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये महाभारतीय स्त्रिया हतबल आणि शरणशील दिसतात.

### संदर्भ– टिपा :

1.डॉ. आ. ह. साळुंखे, महाभारतातील स्त्रिया भाग 1, पुणे, आवृत्ती चौथी, 2006, पृ. क्र. 75
2.तत्रैव, पृ. क्र. 10
3.इरावती कर्वे, युगांत, पुणे, आवृत्ती सहावी, 1990, पृ. क्र. 69
4.तत्रैव, पृ. क्र. 75
5.डॉ. आ. ह. साळुंखे, उनि, पृ. क्र. 98
6.डॉ. आ. ह. साळुंखे, महाभारतातील स्त्रिया भाग २, सातारा, पुनर्मुद्रण 2008, पृ. क्र. 59
7.डॉ. रवींद्र शोभणे, महाभारताचा मूल्यवेध, नागपूर, आवृत्ती दुसरी 2012, पृ. क्र. 90

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org